जनसंपर्क कक्ष
13 NOV 2022 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘उंबळट’मध्ये चंदगडी बोली, संस्कृतीचे दर्शन : प्रमोद पाटील

## महावीर महाविद्यालयात गोपाळ गावडे यांच्या संग्रहाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** चंदगडी भाषा, बोली आणि संस्कृतीचे दर्शन ‘उंबळट’ या व्यक्तिचित्रण संग्रहात घडते. मराठी भाषेची कक्षा रुंदावणारे हे पुस्तक असून ते भाषेच्या संशोधनासाठी उपयुक्त आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी केले.



कोल्हापुरात ‘उंबळट’ व्यक्तिचित्रण संग्रहाचे प्रकाशन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी जे. बी. बाचूळकर, नंदकुमार मोरे, राजेंद्र लोखंडे, गोपाळ गावडे, इंद्रायणी गावडे उपस्थित होते.

येथील प्रा. डॉ. गोपाळ गावडेलिखित ‘उंबळट’ या पुस्तकाच्या प्रकाशनावेळी ते बोलत होते. महावीर महाविद्यालयाच्या ॲम्पी थिएटरमधील या कार्यक्रमास विद्यापीठातील मराठी विभागाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे प्रमुख उपस्थित, तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे होते. मला भेटलेली माणसे, त्यांचे स्वभाव, त्यांच्यातील प्रेमळपणा, करूणा, सहभाव आणि बोली यांना व्यक्त करण्यासाठी मी ही व्यक्तिचित्रे लिहिली असल्याचे प्रा. गावडे यांनी सांगितले. प्रा. गावडे हे संवर्धनशील लेखक असल्याचे प्राचार्य डॉ. लोखंडे यांनी सांगितले. उद्योगपती जे. बी. बाचूळकर, कवी एकनाथ पाटील, राजा माळगी, इंद्रायणी गावडे, आदी उपस्थित होते. महाराष्ट्र केसरी विष्णू जोशीलकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. गोमटेश्वर पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. मानकेश हिरेमठ यांनी सूत्रसंचालन केले. विनोद कांबळे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
13 NOV 2022 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संख्याशास्त्रज्ञांना अद्ययावत माहिती हवी

## डॉ. प्रकाश पाटील › शिवाजी विद्यापीठात एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

सध्याचे युग 'बिग डाटा'चे आहे. या महाप्रचंड माहितीच्या विश्लेषणासाठी उपलब्ध समस्त संख्याशास्त्रीय पद्धतींचा प्रभावी वापर करण्यासाठी संख्याशास्त्रज्ञांनी अद्ययावत माहितीसह सुसज्ज असायला हवे, असे प्रतिपादन अमेरिकेतील मिसिसिपी स्टेट विद्यापीठाच्या गणित व संख्याशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. प्रकाश पाटील यांनी शनिवारी शिवाजी विद्यापीठात केले.



विद्यापीठाच्या हीरकमहोत्सवाच्या निमित्ताने येथील संख्याशास्त्र अधिविभागातर्फे 'नॉन-पेरामॅट्रिक स्टॅटिस्टिकल मेथडस्' या विषयावर एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेच्या उद्घाटन समारंभात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. यावेळी डॉ. के. एस. माधवराव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागाचे प्राध्यापक डॉ. टी. व्ही. रामनाथन यांनी मार्गदर्शन केले. संख्याशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. शशिभूषण महाडिक यांनी प्रास्ताविक केले. समन्वयक डॉ. सोमनाथ पवार यांनी परिषदेविषयी माहिती दिली. डॉ. संतोष सुतार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एस. व्ही. राजगुरू यांनी आभार मानले.

13 NOV 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विश्लेषणासाठी संख्याशास्त्राचा प्रभावी वापर आवश्यक

## डॉ. प्रकाश पाटील : शिवाजी विद्यापीठात हीरक महोत्सवानिमित्त आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : सध्याचे युग 'बिग डेटा'चे आहे. या महाप्रचंड माहितीच्या विश्लेषणासाठी उपलब्ध संख्याशास्त्रीय पद्धतींचा प्रभावी वापर करण्यासाठी संख्याशास्त्रज्ञांनी अद्ययावत माहितीसह सुसज्ज राहावे, असे आवाहन अमेरिकेतील मिसिसिपी स्टेट विद्यापीठाच्या गणित व संख्याशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. प्रकाश पाटील यांनी शनिवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या हीरक महोत्सवाच्या निमित्ताने संख्याशास्त्र अधिविभागाने राजर्षी शाहू सभागृहात 'नॉन-पेरामॅट्रिक स्टॅटिस्टिकल मेथड्स' या



विषयावर एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले होते. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते.

पाटील म्हणाले, सद्यस्थितीत निर्माण होणाऱ्या अफाट माहितीच्या विश्लेषणाच्या प्रचलित पद्धतींमध्येही सुलभीकरण करण्यासाठी संख्याशास्त्रात अप्रचालिय पद्धती (नॉन-पॅरामेट्रिक मेथड्स) अधिक प्रभावी ठरत आहेत. पण, त्याचा वापर योग्य दिशेने प्रभावीरित्या कसा करायचा, यासाठी विद्यार्थी-संशोधकांनी योग्य प्रशिक्षण घेणे अत्यावश्यक आहे.

मुंबई एनएमआयएमएस अभिमत विद्यापीठाच्या सुनंदन दिवाटिया स्कूल ऑफ सायन्सचे डॉ. के. एस. माधव राव म्हणाले, प्रचालिय पद्धतींच्या तुलनेत वैद्यकीय, उद्योग-व्यवसाय, सामाजिक संस्था अशी अनेक क्षेत्रे सांख्यिकीय विश्लेषणासाठी अप्रचालिय पद्धतींचा वापर करत आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागाचे प्राध्यापक डॉ. टी. व्ही. रामनाथन म्हणाले, अरेषीय व नैकरेषीय बाबींच्या शक्यतांचा हा कालखंड आहे. या काळात अप्रचालिय सांख्यिकीय पद्धतींना मोठे महत्त्व येणे स्वाभाविक आहे. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, संख्याशास्त्रात उत्तम कामगिरी करायची असेल, तर विद्यार्थ्यांनी गणितातही आपली गती उत्तम राखावी. संख्याशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. शशीभूषण महाडिक यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सोमनाथ पवार यांनी परिषदेविषयी माहिती दिली. डॉ. संतोष सुतार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एस. व्ही. राजगुरू यांनी आभार मानले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ सिनेटसाठी उद्या मतदान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील विविध अधिकार मंडळासाठी सोमवार, १४ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. पदवीधरसाठी ३६,३४३ तर शिक्षकांसाठी ६४० मतदार असणार आहेत. विद्यापीठ प्रशासनाकडून मतदानाची संपूर्ण तयारी पूर्ण झाली आहे.

विद्यापीठ प्रशासनाने मतदार केंद्रांची नावे व तेथे होणारे मतदान यांची यादी निवडणूक विभागाने प्रसिद्ध केली आहे. त्यामुळे सर्वच संघटना, आघाड्या संबंधित मतदान केंद्र परिसरातील मतदारांची जुळवाजुळव गुंतल्या आहेत. यंदा पदवीधर मतदारांची संख्या जास्त असल्याने मतदान केंद्रात वाढ झाली आहे. प्रचारात दोन्ही बाजूंनी जोरदार बाजू मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

13 NOV 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संख्याशास्त्रज्ञांनी माहितीसह सुसज्ज असायला हवे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

सध्याचे युग 'बिग डाटा'चे आहे. या महाप्रचंड माहितीच्या विश्लेषणासाठी उपलब्ध समस्त संख्याशास्त्रीय पद्धतींचा प्रभावी वापर करण्यासाठी संख्याशास्त्रज्ञांनी अद्ययावत माहितीसह सुसज्ज असायला हवे, असे प्रतिपादन अमेरिकेतील मिसिसिपी स्टेट विद्यापीठातील डॉ. प्रकाश पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागाच्या वतीने 'नॉन-पॅरामॅट्रिक स्टॅटिस्टिकल मेथड्स' या विषयावर एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेच्या उद्घाटन समारंभात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते.

यावेळी दक्षिण आफ्रिकेतील बोटस्वाना विद्यापीठाचे निवृत्त प्रा. डॉ. के. एस. माधव राव, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्रा. डॉ. टी. व्ही. रामनाथन यांनी मार्गदर्शन केले. संख्याशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. शशीभूषण महाडिक यांनी स्वागत केले. समन्वयक डॉ. सोमनाथ पवार यांनी परिषदेविषयी माहिती दिली. डॉ. संतोष सुतार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एस. व्ही. राजगुरू यांनी आभार मानले.

पुण्यनगरी

# नोंदणीकृत मतदारांना आणण्याचे आव्हान

## शिवाजी विद्यापीठ सिनेट निवडणूक, उद्या मतदान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ अधिसभेसाठी सोमवार, दि. १४ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. यंदा नोंदणीकृत पदवीधर गटासाठी मोठी चुरशीने नोंदणी झाली. नोंदणी केलेले अधिकाधिक मतदार मतदानादिवशी केंद्रापर्यंत आणण्याचे आव्हान आहे.

शिवाजी विद्यापीठाची अधिसभा व विद्या परिषदेसाठी सोमवारी (दि. १४) मतदान, तर बुधवारी (दि. १६) मतमोजणी होणार आहे. शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी आणि शिव-शाहू आघाडी एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत. एकूण जागांपैकी विकास आघाडीचे एकूण ५४ उमेदवार बिनविरोध निवडून आल्याचा दावा विकास आघाडीकडून यापूर्वीच करण्यात आला, तर बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांचा सत्कार समारंभही झाला. यामध्ये संस्थाचालक गटात ५, विद्या परिषदेत २, प्राचार्यांमध्ये ८ आणि २८ पैकी १८ अभ्यास मंडळातील ३९ उमेदवार बिनविरोध निवडून आल्याचा दावा केला होता. नोंदणीकृत पदवीधर गटातील १० पैकी ८ जागांसाठी चुरस आहे. २५ हजार मतदारांची नोंदणी केल्याचा दावा विकास आघाडीने केला आहे. शिव-शाहू आघाडीकडूनही नोंदणी केली आहे. या मतदारांना मतदानासाठी केंद्रावर आणण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

तरूण भारत



# विद्यापीठाचा १८ रोजी हीरकमहोत्सव सोहळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा हीरकमहोत्सवी वर्धापनदिन येत्या शुक्रवार १८ रोजी साजरा होत आहे. शिवाजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील व दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. संजय डी. सावंत हे उपस्थित राहणार आहेत. तसेच कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के हे अध्यक्षस्थान भुषवणार आहेत. सकाळी साडे आठ वाजता ध्वजारोहण करुन कार्यक्रमाला सुरुवात केली जाईल.

13 NOV 2022

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ निवडणूक प्रचार संपला

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठांतील विविध अधिकार मंडळांसाठी सोमवार, १४ रोजी मतदान होणार आहे. तिन्ही जिल्ह्यातील ३३ मतदान केंद्रावर मतदान होणार असून विद्यापीठ प्रशासनाने मतदान सुरळीत पार पडावे म्हणून जय्यत तयारी केली आहे. अस्थापनाकडून केंद्रनिहाय कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली असून जवळपास २०० पेक्षा जास्त कर्मचारी निवडणुकीचे काम करणार आहेत. तर शनिवारी प्रचाराच्या अखेरच्या दिवशी सर्वच संघटनांकडून प्रचार पूर्ण झाला आहे.

गेल्या आठ दिवसापासून विद्यापीठ परिक्षेत्रातील कॉलेजमध्ये विद्यापीठ विकास आघाडी, सुटा आणि शिव-शाहू आघडीच्या वतीने प्रचाराच्या तोफा धडाडत होत्या. आपल्या संघटनेचा अजेंडा काय आहे, उमेदवारांची ओळख करून देण्यात सर्वच



- **परिक्षेत्रातील ३३ मतदान केंद्रावर सोमवारी मतदान**

संघटनेचे पदाधिकारी, सदस्य व्यस्त होते. रविवार आणि सोमवार मतदान केंद्राच्या परिसरात उमेदवार किंवा संघटनेच्या लोकांना प्रचार करता येणार नाही, अशा सूचना विद्यापीठ प्रशासनाने उमेदवारांना दिल्या आहेत. त्यामुळे आजपासून प्रचार सभांना पूर्णविराम मिळाला आहे.

**सर्व जागा निवडून येतील : वि. विकास आघाडी**

विद्यापीठ विकास आघाडीने तिन्ही जिल्ह्यात वेगवेगळ्या समित्या नेमूण त्यांच्याकडे जबाबदारी दिली. त्याचा आढावा घेतला असून, मतदानासाठी मतदारांना कसे मतदार केंद्रावर घेवून जाण्यासाठी तिन्ही जिल्ह्यात वाहनांची व्यवस्था केली आहे. तसेच आघाडीत संस्थाचालक, प्राचार्य असल्याने चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे सर्व जागा निवडून येतील, असा विश्वास आघाडीच्या वतीने व्यक्त होतोय.

### दोन याचिकांना पुढची तारीख

शिक्षक मतदार यादीतील प्राचार्य व विभागप्रमुखांची नावे काढून टाका, अशी तक्रार कुलगुरूंकडे सुटाने केली होती. परंतू त्याकडे दुर्लक्ष करीत ही नावे यादीत तशीच ठेवली. याविरोधात सुटाने हायकोर्टात याचिका दाखल केली होती. शुक्रवारी झालेल्या सुनावणीत दोन्ही याचिकांवर कोणताच निर्णय न घेता पुढची तारीख दिली आहे. तर डॉ. दणाने यांचा याचिका अर्ज वेळेत न आल्याने ही याचिका फेटाळली आहे. आमचा प्रचार संपला असून सर्व जागा निवडून येतील असा आम्हाला विश्वास आहे.

**- डॉ. डी. एन. पाटील (प्रमुख कार्यवाह, सुटा)**

### सुटाची याचिका फेटाळली

नवीन विद्यापीठ कायद्यानुसार निवडणुकीत प्राचार्यांना शिक्षक मतदारसंघात मतदानाचा अधिकार मिळाला आहे. प्रचाराच्या पत्रकात न्यायालयाने आदेश देऊनही प्राचार्यांची नावे वगळली आहेत. सुनावणीपूर्वी चुकीची माहिती दिल्याबद्दल सुटावर विद्यापीठाने कडक कारवाई करावी. मतदारांना सुटाच्या खोट्या प्रचाराला बळी पडू नये.

**- डॉ. व्ही. एम. पाटील (विद्यापीठ विकास आघाडीचे सहकार्यवाहक)**

13 NOV 2022

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# माहिती विश्लेषणासाठी संख्याशास्त्राचा प्रभावी वापर आवश्यक

## डॉ.प्रकाश पाटील ;शिवाजी विद्यापीठात एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद

कोल्हापूर,ता.१२(प्रतिनिधी)-

**सध्याचे युग 'बिग डाटा'चे आहे.या महाप्रचंड माहितीच्या विश्लेषणासाठी उपलब्ध समस्त संख्याशास्त्रीय पद्धतींचा प्रभावी वापर करण्यासाठी संख्याशास्त्रज्ञांनी अद्यावत माहितीसह सुसज्ज असायला हवे, असे प्रतिपादन अमेरिकेतील मिसिसिपी स्टेट विद्यापीठाच्या गणित व संख्याशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. प्रकाश पाटील यांनी आज येथे केले.**

शिवाजी विद्यापीठाच्या हीरक महोत्सवाच्या निमित्ताने येथील संख्याशास्त्र अधिविभागाच्यावतीने 'नॉन-पेरामॅट्रिक स्टॅटिस्टिकल मेथड्स' या विषयावर एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेच्या उद्घाटन समारंभात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या परिषदेच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ.दिगंबर शिर्के होते.

डॉ.प्रकाश पाटील म्हणाले, सद्यस्थितीत कधी नव्हे इतक्या मोठ्या प्रमाणात डाटा निर्माण होतो आहे. त्याची गती आणि व्याप्ती अफाट आहे. त्यामुळे या बिग डाटाच्या विश्लेषणाच्या प्रचलित पद्धतींमध्येही त्यानुरुप बदल होणे आणि करणे अनिवार्य आहे. माहितीचे सुलभीकरण करण्यासाठी ही अत्यावश्यक बाब आहे. संख्याशास्त्रात डाटा विश्लेषणाची अनेक साधने व पद्धती प्रचलित आहेत. अप्रचालिय पद्धती (नॉन-पॅरामेट्रिक मेथड्स) त्यामध्ये सध्या अधिक प्रभावी ठरत आहेत. पण त्यांचा वापर योग्य दिशेने प्रभावीरित्या कसा करावयाचा यासाठी विद्यार्थी-संशोधकांनी योग्य प्रशिक्षण घेणे अत्यावश्यक आहे. त्या दृष्टीने ही परिषद महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास



त्यांनी व्यक्त केला.

यावेळी दक्षिण आफ्रिकेतील बोट्सवाना विद्यापीठाचे निवृत्त प्राध्यापक तथा मुंबई एनएमआयएमएस अभिमत विद्यापीठाच्या सुनंदन दिवाटिया स्कूल ऑफ सायन्सचे डॉ.के.एस.माधवराव म्हणाले, संख्याशास्त्रातील अप्रचालिय पद्धती या प्रचालिय पद्धतींच्या तुलनेत विविध क्षेत्रांत अधिक मोठ्या प्रमाणात आणि अधिक सहजतेने वापरल्या जात आहेत.

यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागाचे प्राध्यापक डॉ. टी.व्ही. रामनाथन म्हणाले, सध्या एकूणच जग हे सामान्य आणि एकरेषीय बाबींपासून दूर सरकण्याच्या प्रयत्नात आहे. या काळात अप्रचालिय सांख्यिकीय पद्धतींना मोठे महत्त्व येणे स्वाभाविक आहे. त्यामुळे या विषयावर चर्चा करण्याची, समजून घेण्याची आणि त्यावर काम करण्याची हीच योग्य वेळ आहे.अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, ज्या विद्यार्थ्यांना संख्याशास्त्रात उत्तम कामगिरी करावयाची असेल, तर गणितातही आपली गती उत्तम असायला हवी, याचे भान सदैव बाळगावे. तसेच, अप्रचालिय संख्याशास्त्रीय पद्धती हा अत्यंत रोचक विषय असून या परिषदेत सहभागी विद्यार्थी, संशोधकांनी त्याच्या सर्व बाजू समजून घेण्यावर भर द्यावा. परिषदेस उपस्थित सर्व मान्यवर तज्ज्ञांनी या विषयाच्या संशोधनात हयात घालविलेली आहे. त्यांच्या अनुभवाचा लाभ विद्यार्थ्यांनी घेणे आवश्यक आहे, असे आवाहन त्यांनी केले. संख्याशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. शशीभूषण महाडिक यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. समन्वयक डॉ. सोमनाथ पवार यांनी परिषदेविषयी माहिती दिली. डॉ. संतोष सुतार यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. एस.व्ही. राजगुरू यांनी आभार मानले.